रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

दिनांक : 25 सप्टेंबर 2019

## राष्ट्रीय सेवा योजना

### उद्घाटन सोहळा

आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर येथे आज २५ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन सोहळा पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एन. बी. माने (यशवंतराव चव्हाण इन्स्टुट्युट ऑफ सायन्स सातारा) हे लाभले त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रीद वाक्य 'नॉट मी बट यू' याचा सखोल अर्थ उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना समजावून सांगितला. त्यांनी त्यांच्या व्याख्यानांमध्ये डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांचा उल्लेख केला व त्यांचे चरित्र सांगितले. व्यक्तिमत्व विकास कसा करायचा याचेही त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले. आपल्या अवतीभोवती असणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध उदाहरणे देऊन राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक कसा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा असला पाहिजे याचे मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कदम लाभले. या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक अभिजीत माने यांनी मानले. तसेच या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. के.बी. भोसले डॉ. ए. एस. खाडे व प्रा. ए. बी. माने व बी. ए. सोनार यांनी केले.

**निष्पत्ती (Outcome)**

- ❑ विद्यार्थ्यांना एन.एस.एस. चे महत्त्व समजले.
  दृष्टीने स्वच्छेतेचे महत्त्व पटले.
- ❑ एन.एस.एस. स्वयंसेवकांना समाजाप्रती असलेल्या जबाबदारीचे भान जागृत झाले.

लाभार्थी संख्या : 125





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)